
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

E-MAIL - sscboardp
Website- www.sscboardpune.in



दिनांक / 05 / 2026

कमांक पुविमं / ओ.1 -ओ.2 / खाजगी /
पुणे 411005 11600
दिनांक 5 / 11 / 2026

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा पुणे/अहिल्यानगर/सोलापूर

विषयः– माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) फेब्रु–मार्च **2027** परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ठ (अर्ज क्रं.17) होणाऱ्य विद्यार्थ्यांना नावनोंदणी करणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ . राज्य मंडळ /परीक्षा.3 / 4783 दिनांक 04 / 11 / **2026** चे पत्र व प्रकटन

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12 वी) फेब्रु–मार्च **2027** परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून प्रविष्ठ नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने पध्दतीने नियमित, विलंब व अतिविलंब शुल्कासह स्विकारण्यासाठी दि. 01 / 08 / 2026 ते दि. 31 / 10 / 2026 पर्यंत मुदत देण्यात आली होती.

जे विद्यार्थी सदर मुदतीत नावनोंदणी करू शकले नाहीत, अशा विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी अर्ज अतिविलंब शुल्कासह ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मुदतवाढ देण्यात आली आहे.

तपशील	अतिविलंब शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन सादर करणे (मुदतवाढ)
विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरून मूळ अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे.	गुरूवार दि. 05 / 11 / 2026 ते बुधवार दि. 18 / 11 / 2026 पर्यंत

1. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नावनोंदणी अर्ज करण्यासाठी या वेबसाईटचा वापर करावा. सदर अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर सूचना वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.
2. नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबंधित माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी फेब्रुवारी–मार्च 2027 परीक्षची आवेदनपत्रे मुदतीत दि. (दि30 / 11 / 2026 पर्यंत) भरणे सुलभ होईल.
3. शाळा व क. महाविद्यालयाच्या लॉगीन मध्ये ऑनलाईनरित्या प्राप्त विद्यार्थ्यांचे प्रस्ताव हे मुळ कागदपत्रांसह आपणास प्राप्त न झाल्यास व अपुर्ण प्रस्तावांच्या त्रुटीपुर्ततेकरिता परत पाठविण्यात आलेल्या आपल्या क.महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना लेखी किंवा एसएमएस द्वारे कळवून त्यांची नोंद आपल्या कार्यालयातील अभिलेखात जतन करून ठेवण्यात यावी.
4. फेब्रुवारी–मार्च 2027 परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी अर्ज करण्यासाठी यानंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

सोबत :– संदर्भिय प्रकटन

MBRaut
(डॉ. मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

विषय-खाजगी विद्यार्थी (Private Candidate) नावनोंदणी अर्ज मुदतवाढ

प्रकटन

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ .१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२वी) फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं १७ भरुन परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

इ १० वी व इ १२वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरिता सर्व शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मंडळाच्या अटी शर्तीनुसार नावनोंदणी करण्याकरिता उपलब्ध आहेत यासंदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक पुस्तिका मंडळाच्या http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे तसेच अधिक माहितीसाठी सर्व विद्यार्थी / शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी आपल्या कार्यकक्षेतील विभागीय मंडळाशी संपर्क साधावा

फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ .१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं. १७) अतिविलंब शुल्काने सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे.

तपशील	अतिविलंब शुल्काने नावनोंदणी अर्ज ऑनलाईन सादर करणे (मुदतवाढ)
विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन मूळ अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोहोचपावतीच्या दोन छायाप्रती व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत/कनिष्ठ महाविद्यालयात जमा करणे.	गुरुवार दि. ०५/११/२०२६ ते बुधवार दि.१८/११/२०२६ पर्यंत

1. खाजगी विद्यार्थ्यांनी इ. १० वी व इ. १२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन (offline) अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
2. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी http://www.mahahsscboard.in या संकेतस्थळाचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरवात करावी. या संदर्भात अधिक माहितीसाठी शाळा/कनिष्ठ महाविद्यालय/विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा.
3. विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्याकरिता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास द्वितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वत:चा पासपोर्ट आकारातील फोटो स्वत:जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरतांना सदर कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.
4. पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) ऑनलाईन देण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी. तसेच पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination Form) मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत (दि.३०/११/२०२६ पर्यंत) परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे व आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांनी छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे संबंधित माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाकडून परत घेऊन जाण्याची दक्षता घ्यावी.
5. फेब्रुवारी--मार्च २०२७ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी म्हणून नावनोंदणी अर्ज करण्यासाठी यानंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्य मंडळ, पुणे-०४

दिनांक: ०४/११/२०२६

Scanned with OKEN Scanner